महिला मार्गदर्शन केंद्र
सख्य
हिंसा थांबवा

# Sakhya Women's Guidence Cell

स्त्री सबळीकरणातून स्त्रीपुरूष समानता

# हुंकार - Emergin Response

वर्ष : १३ वे   अंक : ३८   मार्च २०२५

या अंकात...

लिंग समानता प्रक्रियेला गती की ?
आंतरराष्ट्रीय महिला दिवसाचे भारतीय....
लिंगसमानतेसाठी...
लिंगसमानता:गती
लिंगभाव समानतेसाठी...
ऑक्टो. ते फेब्रु. अहवाल

● प्रकाशक ●
डॉ. नॅटी लोपीस

● संपादक मंडळ ●
शालिनी जाधव
नीता पवार
चेरील परेरा

● सख्य परिवार ●
डॉ. नॅटी लोपीस
ब्रिटा फर्नांडिस
रुपाली मर्ती
ॲड. विद्या पाटील
ॲड. रुशीला रिबेलो
ॲड. श्रद्धा पाटील
शालिनी जाधव
निता पवार, माया मोरे
चेरील परेरा
अनिता गावीत
रेखा घोषा
पार्वती दादोडा
आशा तुपे,
पुष्पा पवार

प्रकाशकीय

## लिंग समानता प्रक्रियेला गती की ? आत्मपरीक्षण?

*- डॉ. नॅटी लोपीस*



सख्य संस्था २०२५ मध्ये आपल्या कार्याची ३८ वर्षे पूर्ण करीत आहे. संस्थेचा उगम हा सामाजिक परिस्थितीमुळे महिलांच्या आणि त्यांच्या कुटुंबियांवर होणाऱ्या आघाताना वेळेस आळा घालण्यास वा पर्याय शोधण्यास शासकीय अधिकाऱ्यांनी दिलेली हाक होती. निर्मला निकेतन, कॉलेज ऑफ सोशल वर्कने सुरु केलाला हा प्रोजेक्ट एक संस्था म्हणून पालघर, ठाणे आणि मुंबईमध्ये कार्यरत आहे.

समाजामध्ये रुढी परंपरेच्या माध्यमातून वेगवेगळ्या घटकांकडे बघण्याचा दृष्टीकोन हा प्रगल्भ नव्हता आणि म्हणूनच वेळोवेळी समाजसुधारकांना संबंधित प्रश्नाच्या तळाशी जाऊन बघण्याची गरज होती. सिव्हील हॉस्पीटल आपत्कालीन विभागातील जाळलेल्या किंवा जीवनाला कंटाळून अंत करणाऱ्या महिला त्यांच्या जिवाशी झुंजत होत्या.

सामाजिक समस्येबरोबरच हे प्रश्न राजकीय होते. कायद्याची तरतूद आणि अंमलबजावणी करण्याची गरज लक्षात घेऊन जाणीव जागृती, प्रशिक्षण, समाजातील प्रथाचे टिकात्मक विश्वलेष्ण या सर्व रणनीती आखत समाजाच्या वेगवेगळ्या घटकापर्यंत सर्वांना माणुसकीने जगण्याचा अधिकाराचा उहापोह राष्ट्रीय आणि आंतराष्ट्रीय पातळीवर केला गेला.

हिंसेवर प्रतिबंध करण्यासाठी कायदे आणि सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी राज्यपातळीवर समाजकल्याणाच्या माध्यमातून माता आणि बाळाच्या आरोग्यापासून बचत गटामध्ये आर्थिक समीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. त्याद्वारे छोटे उद्योजिका बनण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले गेले.

घरातील कामाबरोबर महिला घराबाहेर अर्थाजनासाठी पडल्या. शैक्षणिक बाबतीत नैपूण्य मिळवून पुरुषांच्या खाद्याला खांदा लावून महिला उभी राहताना समाजाचे एकूण सामाजीकरण असे झाले आहे की तिने शिकू दे पण रात्री अपरात्रीच्या कामाच्या वेळा तिच्यासाठी योग्य नाही.

(पान ६ वर)

सख्य कार्यालय : सिल्वेस्टर स्मृती, पहिला मजला, पोलीस चौकीच्यासमोर, कळंब रोड, निर्मळ नाका, नालासोपारा (प.)
ता. वसई, जि. पालघर, पिन - ४०१ ३०४ वेळ : सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.००
मोबाईल : 9890312402, Email : sankhya_87@rediffmail.com
Website : www.sakhyawgc.org, Facebook : Sakhyawomen'sGuidance Cell
'सख्य' विस्तारीत शाखा : मेंटल हॉस्पिटल रोड, धर्मवीर नगर, ठाणे - ४०० ६०१.
वेळ - सोमवार ते शनिवार सकाळी १०.०० ते संध्याकाळी ६.०० वाजता मोबाईल : 9136090564
- वसई विरार शहर महानगरपालिका रुग्णालय,तुळींज, नगिनदास पाडा, नालासोपारा (पुर्व)पालघर -४०१२०९
- सर डी. ए, पेटीट रुग्णालय, पारनाका, वसई (प.)
- ००५, नवीन प्रशासकीय इमारत, महिला व बाल विकास विभाग, जिल्हा परिषद पालघर कोळगांव.




वाटचाल शाश्वत विकासाकडे....

सपोर्ट ग्रुप प्रोग्राम

ार्यशाळा

कर्मचारी श्रमतावृद्धी

प्रशिक्षण कार्यक्रम

Participatory Inquiry - Review Process

# आंतरराष्ट्रीय महिला दिवसाचे भारतीय स्त्रियांशी भगिनी भावाचे नाते

सर्व सामान्य माणसाला वाटतं की चळवळी आणि सामाजिक कार्य या लष्कराच्या भाकरी आहेत. त्यांनी आपल्या आयुष्यात काय दिलं आहे?

म्हणून सामान्य माणसं चळवळीपासून दूर राहण्याचा प्रयत्न करतात. आपण आपल्या कामाशी काम ठेवायचे आणि शांत पणाने जगायचे. असं म्हणत असताना लक्षत येते, की महागाई वाढली, नळाला तीन तीन दिवस पाणी येत नाही, वीज बंद पडते, कधी महिना महिना पगार मिळत नाही, घरात गरिबी थैमान घालते आणि लहान पिल्ले सुद्धा आई वडिलांबरोबर मजुरीला जाऊ लागतात, एखादी आई रेशन च्या दुकानावर आपले रेशन / आधार कार्ड दाखवू शकली नाही, म्हणून तिला रेशन मिळत नाही आणि अकरा वर्षाची पोर चार दिवस तोंडात अन्नाचा कण गेला नाही, म्हणून भात भात करत तडफडून मरते, रस्त्यावर मुलीची छेडखानी काढणारा मुलगा कुणाचं ऐकत नाही, कुणावर बलात्कार झाला म्हणून, तर कुणी हुंडा दिला नाही म्हणून जाळून टाकली जाते, कुणाला नवऱ्याने मारलं , रात्री घराबाहेर लहान पोरं घेऊन बाहेर पडावं लागतं, कुणाचं घर मेट्रो येणार म्हणून एका झटक्यात तोडलं जातं आणि रस्त्यावर यावं लागतं तेव्हा

अशा वेळी सामाजिक चळवळी उभ्या कराव्या लागतात. किंवा सामाजिक चळवळी करणाऱ्या कार्यकर्त्यां कडे जाऊन तक्रार करायला जातो. मग

अशा अनेक प्रश्नांना तोंड फोडण्यासाठी ही माणसं रान करतात,. न्याय मिळवून देण्यासाठी जी धडपडतात, त्या कार्यकर्त्यांमुळे हे प्रश्न सार्वजनिक रूपाने शासन समोर, लोक प्रतिनिधी समोर मांडले जातात. न्यायासाठी जन वकालत करावी लागते. सरकारला वेठिला धरून हे प्रश्न सोडवण्यासाठी जेव्हा चळवळी केल्या जातात. तेव्हा सरकारला, सत्तेला लोकांवर होणाऱ्या अन्यायाची दखल घ्यावी लागते. त्यासाठी धोरणे, कायदे, निति नियम बनवून त्यांचे कायद्यात रूपांतर करून जनहितासाठी अंमलात आणण्याचे निर्णय घ्यावे लागतात.

त्यामुळे अशा चळवळींनी सामान्य माणसांचे प्रश्न सोडवले आहेत, त्या झाल्या नसत्या तर आज आपले हक्क आपल्याला मिळाले नसते, हे सामान्य माणसाने समजून घेतले पाहिजे.

आपल्या इथे अगदी आपल्या गावासारख्या, शहरासारख्या, वस्तीसारख्या ठिकाणी राहणाऱ्या एखाद्या मच्छीमार, आदिवासी, कष्टकरी, रोजगार हमी वर मजूर असणाऱ्या, सचिवालयात , बँकेत, एल आय सी मध्ये, कर्मचारी असणाऱ्या, कंपन्या, कारखान्यात कामगार म्हणून काम करणाऱ्या , उत्पादक, लघु उद्योग, शेती, व छोटे व्यवसाय करणाऱ्या सर्व , सर्व स्त्रियांच्या अधिकाराचा जेव्हा प्रश्न आला तेव्हा तेव्हा तो चळवळ केल्याशिवाय सुटलेला नाही.

पण तुम्हाला आश्चर्य हे वाटेल की स्त्रियांच्या हक्कांची चळवळ फक्त स्थानिक , जिल्हा, राज्य , देश पातळीवर नाही तर आंतर राष्ट्रीय पातळीवर झाली. आणि इतर देशात तेथील स्त्रियांनी ज्या मागण्या केल्या त्या चे पडसाद जगभर उमटले. भारतात सुद्धा.

आपल्यापैकी अनेक स्त्रियांना आपल्या देशात माहितीच नाही की आपल्याला बाळंतपणाची रजा मिळाली, आपल्याला दिवसा 8 तास काम, आणि मध्ये जेवणाची सुट्टी या साठी सुद्धा संघर्ष करावा लागला, आणि त्यामुळे आपले कामाचे चौदा तास आठवर आलेत.

ते स्त्रियांनी जगभरामध्ये केलेल्या चळवळीमुळे आज आपल्याला हे फायदे मिळाले आहेत. पण ते आपसूक नाहीत. त्यासाठीं तशी तरतूद संविधानात करावी लागली. घटना समितीचे अध्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी या सर्व समकालीन व ऐतिहासिक चळवळींनी केलेल्या मागण्या आणि स्त्रियांनी मिळवून घेतलेले हक्क याचा सविस्तर आणि सखोल अभ्यास केला होता.

त्यांच्या सोबत असलेल्या संविधान समिती मध्ये असलेल्या 15 महिला सदस्यांनी या संदर्भात स्वतंत्र भारतात महिलांना कोणते हक्क मिळायला हवेत याचा अभ्यास केला होता. पण तरी एक गोष्ट झाली की यांच्या पैकी दोन सदस्य सोडल्या तर हिंदू कोड बिल संदर्भात बाबासाहेबांच्या विरुद्ध मत दिले. आणि बाबासाहेबांनी या देशातील स्त्रियांना वारसा हक्क मिळायला हवा म्हणून पार्लमेंट मध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून राजीनामा दिला.

खूप कमी लोकांना हे माहिती आहे की बाबासाहेब यांचे विदेशातील स्त्री चळवळीने केलेल्या मागण्यांचा इतका सखोल अभ्यास होता की त्यांनी भारतीय स्त्रियांना नागरिक म्हणून मतदानाचा हक्क सहज बहाल केला.

परंतु या मतदानाच्या हक्कासाठी इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स , जर्मनी इत्यादी देशातील स्त्रियांना रस्त्यावर येऊन निदर्शने करावी लागली. पोलिसांचा लाठीमार सहन करावा लागला. त्यांच्यावर घरातील आणि समाजातील पुरुषांनी खूपदा बहिष्कार घातला. स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळालाच पाहिजे म्हणत त्या देशातील उच्चभ्रू, श्रीमंत स्त्रिया रस्त्यावर आल्याने या चळवळीचे लोण तळागाळात पोचले.

जेव्हा कामगार स्त्रियांनी रस्त्यावर येऊन आपल्या हक्कांची मागणी केली, तेव्हा या उच्चभ्रू वर्गातील स्त्रियांनी समाजवादी

विचारसरणी मुळे आपला पूर्ण पाठींबा जाहीर केला.

या चळवळींचा इतिहास खूप रोचक आहे. आणि जर्मनीमधील क्लारा झेटकिन किंवा रोझा लक्झेंमबर्ग लढली म्हणून आज आपल्या देशातील कामगार स्त्री आपल्या हककांसाठी लढू शकते ही सुद्धा किती रोमांचक गोष्ट आहे ना? या सर्वांच्या संघर्षाला जेव्हां यश मिळाले त्याची आठवण म्हणून आंतरराष्ट्रीय कामगार महिला दिवस साजरा करण्याची सूचना जगभरातील महिला प्रतिनिधींनी उचलून धरली, त्या दिवसाची ऐतिहासिक गाथा सुद्धा प्रेरणादायी आहे.

आज ज्यांना आपण विकसित देश म्हणतो तिथे स्त्रियांनी घरकाम करावे, बाहेर निघून काम करू नये, त्या कोणत्याही धर्मात वरिष्ठ पद घेऊ शकत नव्हत्या, त्यांना पुरुषांच्या बरोबरीने कोणतेच हक्क नव्हते.

19 व्यां शतकात पाश्चात्य देशात सामान्य, गरीब स्त्रियांना नागरिक म्हणून सन्मानाने जगण्याचा अधिकार नव्हता. सर्व संसाधनांवर व मालमत्तेवर पुरुषा इतकेच समान अधिकार असावे यासाठी अगदी महालात राहणाऱ्या अमीर उमराव घरातील स्त्रियांना पुरुषांचा अधिकच विरोध सहन करावा लागला.

अशा गुलामीतून मुक्त होण्यासाठी स्त्री मुक्तीची घोषणा करत जगभरात किती देशांमध्ये वेगवेगळे लढे उभे राहिले. अमेरिका, इंग्लंड, इटली, रोम, रशिया, फ्रांस, सौदी अरेबिया, दक्षिण आशिया, अफगाणिस्थान ,तुर्कस्थान , पॅलेस्टाईन, चीन, व्हिएतनाम इत्यादी अनेक देशात स्त्रियांना माणूस म्हणून स्वातंत्र्य, समता आणि सामनता या मूल्यां साठी प्राण गमवावे लागले आहे.

आज ही अनेक देशात बरेच लोक स्वतंत्र नागरिक नाहीत , त्यात स्त्रियांना दुय्यम मानले जाते आणि स्त्रियांना अजूनही मतदानाचा मूलभूत अधिकार नाही. किंवा काही ठिकाणी त्यांचे मत अर्धे मानले जाते. पूर्ण नाही.

पण आंतरराष्ट्रीय महिला दिवस जगभरातील सर्व देशांमध्ये साजरा केला जाईल ही मागणी ज्या दिवशी मान्य झाली त्या दिवशी ज्या देशात गुलामी आहे, त्या देशांना सुद्धा आपल्या देशातील स्त्रियांची स्थिती आणि त्यांच्यासाठी काय सुधारणा केल्या, त्यांच्या स्टेटस चां रिपोर्ट संयुक्त राष्ट्रसंघ कडे द्यावा लागतो. त्यावरून त्या देशातील स्त्रियांच्या, बालिकांच्या विकासाचा खरा निर्देशांक जगासमोर ठेवावा लागतो.

आता तुम्ही म्हणाल स्त्रियांचा आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणजे सुंदर कपडे घालायचे, मोठ्या कंपन्यांनी प्रायोजित केलेले कार्यक्रम करायचे. काही निवडक स्त्रियांना पुरस्कार द्यायचे, गाणी म्हणायची, नाटक करायचे , यात्रा काढायच्या आणि भाषणे देऊन रात्री मेणबत्त्या पेटवून आपल्या तून निघून गेलेल्या व्यक्तींना श्रद्धांजली द्यायची. आणि मग खाऊन , पिऊन सर्वांनी आनंदाने घरी जायचे. हे असे कार्यक्रम आज काल आंतरराष्ट्रीय महिला दिना निमित्त होतात, स्त्रियांना लागणारे सर्व प्रॉडक्ट्स विकणाऱ्या कंपन्यांसाठी आंतरराष्ट्रीय महिला दिवस मार्केटिंग व जाहिरातीचा दिवस ठरला आहे.

त्यामुळे तुम्हाला वाटते की हा असा महिलांचा नटणे थटणे मिरवणे यासाठीचा दिवस आहे. म्हणून फक्त एकत्र येऊन मजा करत उत्साहाने साजरा करावा. मजा करण्यात गैर काहीच नाही. पण ज्यांनी आपल्याला हा दिवस मिळवून दिला त्यांचे हौतात्म्य समजून घेतले तर मग या दिवसाचे महत्व कळेल.

उत्सव करावा पण आपण आपल्याला मिळालेल्या हक्कांसाठी हा दिवस साजरा करतो, एवढी तरी जाणीव राहावी म्हणून तुम्हाला या दिवसाचा इतिहास इथे थोडक्यात सांगते आहे. आपल्याकडे 1847 साली महात्मा जोतीराव फुले , सावित्री बाई फुले यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली. याच शाळेत भारतातील पहिली मुस्लिम शिक्षिका फातिमा शेख, सावित्री बाई फुले यांच्या सोबत सहशिक्षिका होत्या. म्हणजे स्त्रियांच्या अज्ञानाची गुलामी संपवून ज्ञानाची पहाट झाल्याचा हा सामाजिक क्रांतीचा काळ.

आपल्याकडे इतिहासात 1857 साल हे भारतीय स्वातंत्र्य युद्धाची सुरुवात म्हणून राजकीय क्रांतीची पहाट म्हणून इतिहासात अधोरेखित आहे. या स्वातंत्र्य युद्धाला सुरुवात सुद्धा दोन स्त्रियांनी केली. झाशीची राणी लक्ष्मीबाई आणि तिची सहकारी शूर योद्धा झलकारी बाई. जी लक्ष्मी बाई च्या आधी ब्रिटिश सैन्याच्या गोळयांना सामोरी गेली. तर यांच्या शौर्य कहाण्या आपण ऐकतो.

याच काळात 1857 मध्ये पाश्चात्य देशात मात्र स्त्रिया औद्योगीकरण काळात पोचल्या होत्या. तिथे कारखाने आले होते. युद्धामुळे बेकारी भरपूर होती. लोकांना रोजगार नव्हते. ज्यांना होते त्यांना किमान वेतन पण मिळत नव्हते. आणि कामगार पुरुषांपेक्षा ही कमी वेतन स्त्रियांना मिळत होते. अनेक पुरुष सैन्यात भरती झाल्याने स्त्रियाच घरी मुले, आपले वृद्ध पालक सांभाळत अर्थार्जनाची जबाबदारी पार पाडत होत्या.

* वेगवेगळ्या कारखान्यात काम करणाऱ्या या स्त्रियांनी एकमेकींशी कशा भेटी घेतल्या असतील. पोलिस , सैनिक आणि कारखान्यांचे मालक यांचा सख्त पहारा असताना त्यांनी आपल्या संघटना कशा बांधल्या असतील या सर्व अतिशय थरारक घटना आहेत.

* ८ मार्च १८५७ रोजी, अमेरिकेमध्ये पहिल्यांदा न्यूयॉर्क शहरातील शेकडो महिला वस्त्रोद्योग कामगारांनी त्यांचे कारखान्यांमध्ये जे शोषण होत होते, त्या बद्दल आवाज उठवला. कामाच्या ठिकाणी

एकदा आत गेल्यावर त्यांक्या कडून 14 तास काम करून घेतले जाई. लहान मुलांना बाहेर उपाशी सोडून या स्त्रिया आत काम करत राहायच्या. वेठ बिगार असल्यासारख्या.

त्यांना आपल्या अंगावर दूध पिणाऱ्या लहान मुलांना दूध पाजायला सुद्धा बाहेर पडता येत नव्हते. त्या जर बाहेर गेल्या तर पूर्ण पगार कापला जात होता. पाळणाघरे नसल्याने अनेक लहान मुले बाहेर धुळीत खेळत बसायची. तेव्हा या अशा अन्यायकारक गोष्टी सहन करण्यापेक्षा त्या विरुद्ध लढले पाहिजे असे स्त्रियांनी ठरवले.

कामाच्या ठिकाणी होणाऱ्या शोषणाच्या निषेधार्थ न्यूयॉर्क मधील कामगार स्त्रियांनी मोर्चा काढला. नोकरदार महिलांनी केलेला हा जगातील पहिला संघटित संप होता. या संपाने इतिहास घडवला. इतर देशातील लोकांना प्रेरणा दिली.

एकीकडे पहिल्या महायुद्धाच्या काळात पुरूष युद्धावर आणि स्त्रियांवर सर्व जबाबदारी पडली होती. मोठ्या प्रमाणावर स्त्रिया मजूर म्हणून काम करत होत्या. घरातील सर्व सदस्यांची जबाबदारी त्यांच्यावर होती. रेशन साठी रांग लावावी लागायची. कित्येकदा फक्त कोरडा पाव खाऊन, बटाटा उकडून खवा लागायचा. अठरा विश्व दारिद्र्य पसरलं होतं. जे पुरूष युद्धावर. गेले नाहीत, ते घरातील जबाबदारी घेत नव्हते. दारू आणि जुगार यांच्या आहारी गेले होते. स्त्रिया आपल्या घरात पुरुषांनी केलेला हिंसाचार सहन करत होत्या. कामाच्या ठिकाणी ठेकेदार, मालक यांनी स्त्रियांचे लैंगिक शोषण करणे हा त्यांचा पुरुषसत्ताक हककच आहे असे मानले जात होते. त्यामुळे स्त्रिया बोलल्या तरी त्यांचे आवाज तिथेच दडपले जात होते. त्यामुळे सर्व स्तरातील कामकाजी

महिलांमध्ये प्रचंड अशांतता होती. 1857 ते 1907 इंग्लंड, अमेरिका, रशिया, जर्मनी, फ्रान्स, पोर्तुगाल, पोलंड, आयर्लंड, स्पेन, रोम, इटली इत्यादी अनेक देशात महिलांची आर्थिक स्थिती फार वाईट होती. त्यातून दार वर्षी निदर्शने होत होती. मालक वर्गाशी तडजोडी होत होत्या. कधी बोलणी फिस्कटत. पण कामावर जावेच लागायचे.

गंभीर वादविवाद होत होते. स्त्रियांवरील अत्याचार आणि असमानता स्त्रियांना परिवर्तनाच्या मोहिमेत अधिक आवाज आणि सक्रिय होण्यासाठी प्रेरित करत होती. 1908 मध्ये शिकागो शहरात कामगार स्त्रियांनी जो उठाव केला तो अभूतपूर्व होता.

1908 मध्ये, या मोर्चात किमान 15,000 महिला पोस्टर्स , बॅनर्स घेऊन घोषणा देत गाणी गात रस्त्यावर उतरल्या. कामाच्या स्वरूपानुसार किमान वेतन मर्यादा, पाळणाघरे, आठवड्यातून एक दिवस सुट्टी इत्यादी व मतदानाच्या अधिकारांच्या मागणीसाठी न्यूयॉर्क शहरातून स्त्रियांनी मोर्चा काढला.

सोशलिस्ट पार्टी ऑफ अमेरिकेच्या घोषणेनुसार, 28 फेब्रुवारी रोजी संपूर्ण युनायटेड स्टेट्समध्ये पहिला राष्ट्रीय महिला दिन (NWD) त्यावेळी साजरा करण्यात आला..

1910 मध्ये कोपनहेगन येथे कार्यरत महिलांची दुसरी आंतरराष्ट्रीय परिषद भरली. क्लारा झेटकिन (जर्मनीमधील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या 'महिला कार्यालयाच्या' नेत्या) नावाच्या महिलेने आंतरराष्ट्रीय महिला दिनाची कल्पना समोर मांडली. सर्व महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला पाहिजे, ही मागणी घेऊन स्त्रियांनी जे आंदोलन केले. त्याला सफ्रेजेट आंदोलन असे म्हंटले जाते. या मोहिमेत, १९०९ मध्ये अमेरिकेच्या सोशलिस्ट पार्टीने पहिला राष्ट्रीय महिला दिन आयोजित केला, जो संपूर्ण युनायटेड स्टेट्समध्ये मोठ्या प्रमाणात महिला परिषदा आयोजित करून मतदानाच्या अधिकाराचे ठराव पास करण्यासाठी या दिवसाचे औचित्य साधले गेले.

जर्मन कार्यकर्त्या क्लारा झेटकिन यांच्या प्रोत्साहनाने, आंतरराष्ट्रीय समाजवादी काँग्रेसने १९१० मध्ये महिला दिनास सर्व सहमती जाहीर केली. १९ मार्च १९११ रोजी ऑस्ट्रिया, डेन्मार्क, जर्मनी आणि स्वित्झर्लंडमध्ये पहिला आंतरराष्ट्रीय दिवस आयोजित करण्यात आला. या दिवसाच्या निमित्ताने दहा लाखांहून अधिक लोक रॅलींना उपस्थित राहिले. त्यानंतरच्या काळात इतर देशांमध्ये आणि वेगवेगळ्या तारखांना महिला दिवस या काळात साजरा करण्यात आला होता. कधी ८ मार्च तर कधी २३ फेब्रुवारी, तर कधी 19 मार्च वगैरे.

परंतु सर्वानुमते 8 मार्च ही तारीख 1910 च्या सभेत ठरली होती. तिच्यावर अनेक तत्कालीन समाजवादी देशांनी सहमती व्यक्त केली. १९१७ रोजी, रशियातील पेट्रोग्राड (सेंट पीटर्सबर्ग) येथील महिलांनी अन्न टंचाई, दारिद्र्य आणि पहिल्या महायुद्धाच्या निषेधार्थ संप करून 8 मार्च हा दिवस साजरा केला. "भाकरी आणि शांती" साठी आम्ही महिला एकत्र आलो आहोत असे त्यांनी सांगितले.

युद्ध नको शांतता हवी अशी त्यांनी मागणी केली. त्यांच्या या संपामुळे १९१७ च्या रशियन क्रांतीला चालना मिळाली, त्यानंतर १९२१ मध्ये अधिकृतपणे ८ मार्च ही संयुक्त रीत्या सर्व राष्ट्रांमधील महिला प्रतिनिधींच्या सहमतीने मंजूर करण्यात आली.

प्रत्येक देशात प्रत्येक वर्षी त्याच दिवशी - महिला दिन - त्यांच्या मागण्यांसाठी दबाव आणण्यासाठी साजरा केला जवा या प्रस्तावास 20 पेक्षा अधिक देशांनी सहमती दिली. आणि 17 देशांतील 100 हून अधिक महिलांची परिषद जर्मनीतील सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या 'महिला ' नेत्या क्लारा झेटकिन नावाच्या एका महिलेने आंतरराष्ट्रीय महिला दिनाची कल्पना मांडली. तिने असा

प्रस्ताव मांडला की दरवर्षी प्रत्येक देशात त्याच दिवशी - महिला दिन - साजरा केला पाहिजे जेणेकरून त्यांच्या मागण्यांसाठी त्यांना त्यांच्या सरकार वर दबाव आणता येईल , हा एक उदात्त वैश्विक हेतू या मागे होता.

आपण सुद्धा भारतामध्ये 1947 मध्ये आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यावर साजरा करू लागलो. तरी तो अधिक कामगार महिला दिवस म्हणून कामगार संघटना पाळत असतं. परंतु १९७५ पासून जेव्हा संयुक्त राष्ट्र संघाने आंतर राष्ट्रीय महिला वर्ष जाहीर केले. तेव्हापासून तत्कालीन प्रधानमंत्री मा. इंदिरा गांधी यांनी सरकारी पातळीवर आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याची रीतसर सुरुवात केली. अनेक देशांमध्ये राष्ट्रीय सुट्टी म्हणून साजरा केला जातो.

आज, विशेषतः भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये, महिलांच्या समस्या आणि हक्कांना प्रोत्साहन देण्यासाठी हा आंतरराष्ट्रीय महिला दिवस आपण साजरा करायला हवा. कारण यासाठी विविध देशातील महिला कामगारांनी पोलिसांच्या बुटांचा मार खाल्ला, त्या तुरुंगात गेल्या, आपल्या लहान लहान मुलांसोबत रस्त्यावर दिवस रात्र पिकेटिंग केले. त्यांनी दिलेले हौतात्म्य लक्षात घेऊन आपण महिलांवर होणाऱ्या अत्याचार विरोधात हा दिवस गांभीर्याने साजरा करायला हवा. सर्वच महिला या कष्टकरी आहेत. आणि फक्त बाहेर नोकरीसाठी व मजुरी ला जाणाऱ्या स्त्रियांचे शोषण होते, असे नाही तर घरात राहून चोवीस तास काम करणाऱ्या स्त्री च्या कामाला सुद्धा काम म्हंटले पाहिजे अशी भूमिका स्त्रियांच्या चळवळीने घेतली. आता हा दिवस आंतरराष्ट्रीय महिला कामगार दिवस म्हणून न राहता आंतरराष्ट्रीय महिला दिवस म्हणून आपण साजरा करतो. या लेखावरून तुम्हाला लक्षात आले असेल की एक महिला म्हणून आपल्या गावातील , शहरातील महिलेच्या स्वातंत्र्यासाठी, हक्कासाठी एकेकाळी रेडीमेड कपड्यांच्या किंवा बुट बनवणाऱ्या कारखान्यात काम करणारी प्रत्येक महिला विदेशात लढली, म्हणून आज आपल्या स्वातंत्र्याची किंमत अनमोल आहे.

आंतरराष्ट्रीय महिला दिन जिंदाबाद!!!

लेखक : डॉ. लता प्रतिभा मधुकर
बहुजन स्त्री वादी समीक्षक, लेखक, संशोधक, अनुवादक, प्रशिक्षक, संपादक, सोशल मीडिया संयोजक आणि परिवर्तनवादी चळवळीतील ज्येष्ठ नेतृत्व
मोबाईल: 9922320338 ई मेल: ctdycc2023@gmail.com

यातील संदर्भ फेमिनिस्ट हिस्टरी या वेबसाईट वरून घेतली आहे. तसेच इतर माहिती गूगल वरून , विकिपीडिया वरून घेतली आहे.

---

**(पान १ वरुन)**

I.T.Engineer म्हणून काम करु शकली तरी भौतिक व सामाजिक परिस्थितीमध्ये ती अडकली जाते. मग तिची सुरक्षा हा प्रश्न बनला जातो. यावर्षाच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे ब्रिद आहे समानतेच्या प्रक्रियेला गतीमान बनवा. परंतु आजच्या सामाजिक परिस्थितीमध्ये गती देण्याऐवजी शिक्षण घेतलं परंतु कामाच्या ठिकाणी असलेलं वातावरण, मग ते बाई म्हणून तिला वरच्या पदासाठी करावी लागणारी कसरत किंवा कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडून कामाच्या ठिकाणच्या जबाबदाऱ्या पार पाडण्यास हजरजबाबी राहावे लागते. ही मानसिकता समाजात अधिक प्रभावीपणे रुजवण्याची गरज आहे. ही परिस्थिती मध्यम वर्गीय महिलांची आहे. परंतु रोजगार कमवणारा आणि घरकाम करणाऱ्या महिलेच्या प्रश्न हा अजूनही वेशीवर टांगलेला आहे. ४४ लेबर कोड करून कामगार कायदे हे आताच्या सरकारने कंपन्याना आणि मालकांना त्याचा फायदा होईल अशी नीती आहे. मग कामगार महिलांच्या प्रगतीमध्ये हा अडसर आहे याला गती कशी मिळणार?

कौशल्य प्रशिक्षणाच्या नावाखालीदेखील मोठ्या कंपन्याना ह्या कौशल्याचा कसा वापर होईल किंवा मॉल संस्कृतीमध्ये तरुण आकर्षित होईल. मात्र आर्थिक दृष्ट्या त्यांची पत वाढत नाही. अशा पद्धतीचे विश्लेषण सामाजिक शास्त्रज्ञ रितू दिवाण यांनी आपल्या इंडिया जन्डर रिपोर्ट २०२४ मध्ये वेगवेगळ्या अंगानी लिंगभावाला वेग देण्याऐवजी त्याला अडसर बनले आहे.

वाढत्या महागाई आणि खाण्याच्या वस्तूवर लावलेला कर (GST) यामुळे कुटुंबाच्या भरण पोषणापासून तर आर्थिक नियोजनाचा भार तिच्यावर येऊन पडला आहे. सरकारच्या नीती व धोरण ही कॉरपोरेट संस्कृतीला साथ देणार आहे. तिथे कष्टकऱ्यांना घाम गाळून फार कमी साधन त्याच्या हातात आहेत. त्यामुळे विकासाला गती मिळण्याऐवजी त्यामध्ये अडसर येत आहेत.

आंतरराष्ट्रीय महिलादिनाचे ब्रिद हे आमच्या सारख्या संस्थेना आत्मपरिक्षण करण्यासाठी साद घालत आहे की, तळागाळातील महिलांना योग्य न्याय देण्यासाठी आम्ही कशाप्रकारे तयार आहोत.

# लिंगसमानतेसाठी कृतिशील उपक्रम

**श्री. प्रकाश आल्मेडा**
**मो. ८६००१७८८२५**

भारताच्या संविधानाच्या सरनाम्याची सुरुवात ''आम्ही भारताचे नागरिक'' या शब्दांनी होते. या आम्ही भारतीयांमध्ये कोणत्याही प्रकारची कोणतीही असमानतेला वा विषमतेला थारा नाही, संधीची व मानवी हक्कांसह सर्वांना सुखी जगण्याची समान संधी आहे. एका नव्या राष्ट्रराज्याच्या स्थापनेचे स्वप्न पाहाताना निर्माण होणारी व्यवस्था ही स्वयंसिद्ध व पायाभुत अशा मानवी जिवनाच्या प्रतिष्ठेवर आधारीत असण्याचा निर्धार यात आहे. यात अर्थातच स्त्री पुरुष समानता आहे हे नव्याने सांगण्याची गरज नसली तरीही अशी समानता आजवर नसल्याने व तशी समानता निर्माण होऊ न देणाऱ्या अनेक बाबी आपल्या देशात आहेत याचे भान होते. दिर्घकाळ संघर्ष करून जनमानस व व्यवस्था बदलून अशी स्त्रीपुरुष समानता असणारी व्यवस्था प्रयत्नपूर्वक राज्याच्या सक्रिय हस्तक्षेपाने निर्माण करावी लागणार आहे हे स्पष्ट होते. लिंगसमानतेत शोषण करणारी जुनाट व्यवस्था मोडीत काढून नवी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे होते. हा परिवर्तनीय बदल केवळ सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिकच नव्हे तर आध्यात्मिक स्तरापर्यंत जाणारा असल्याने त्यात मोठीच गुंतागुंत होती. धडाक्यात कायदे नियम करून हे स्त्रीपुरुष असमानतेचे प्रश्न संपणारे नव्हते. राज्यघटना स्थापनेच्या अमृतकाळात ही समानता साध्य करण्यासाठी स्त्रीयांना जे अनेक प्रकारचे हलाहल पचवावे लागले आणि आजही लागत आहे ते पाहाता स्त्रीपुरुष एक राष्ट्र, एक सभ्यता संस्कृती व एक आधुनिक व्यवस्था म्हणून आपण आजवरच्या प्रवासात काय साध्य केले याचा विवेकी आढावा घेऊन कुत्रिम बुद्धीमत्तेच्या काळात इथून पुढे काय, कोठे व कसे याचा कृतिशील विचार करावा लागेल. तातडीने खूप काही बदलावे लागेल. कारण मानवी हक्क, न्याय व समानता या कोणतीही तडजोड स्वीकारता येत नाही अशा ''नॉन निगोशिएबल'' आदर्श समाजाच्या निर्मितीचे आव्हान अजूनही आहेच आणि पुढची वाटही आव्हानांनी, प्रतिरोध व अरिष्टांनी भरलेली आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या ''युनिसेफ'' ने कायमस्वरूपी परिवर्तनकारी बदल करण्याच्या उद्दीष्टाने २०२२-२५ या काळासाठी ''जेंडर ॲक्शन प्लान'' तयार केला त्यात म्हटल्याप्रमाणे लिंगसमानता म्हणजे हक्क, अधिकार, साधनसंपदा, संधी, संरक्षण अशा सर्व बाबतीत समानता असणे. या योजनेत काही कालबद्ध कृतीयोजना करण्यावर भर असून जगभरातील देशांनी असे कृतिकार्यक्रम राबवावेत अशी अपेक्षा आहे. अर्थात लिंगसमानतेचा विचार करताना केवळ स्त्रीपुरूषच नव्हे तर इतर घटकांचाही समग्र विचार करावा लागतो. स्त्रीपुरुष समानता साध्य करण्याचा एक सरधोपट मार्ग म्हणजे विषमता असमानता कमीत कमी करण्यासाठी उपाययोजना करणे वा अशी असमानता वाढविणाऱ्या घटकांना वा त्यांच्या वाढीला शक्य तो प्रतिबंध घालणे. राज्यघटनेने प्रत्येक व्यक्तिला स्वक्षमतेनुसार आत्मविकासाचे केवळ स्वातंत्र्यच नव्हे तर अधिकार दिला आहे. मुळात स्त्रीपुरूष समानतेसाठी कृतिशीलता हवी ती मुलामुलींत समानता आणण्यापासून आणि याची सुरूवात समाजातील औपचारिक व्यवस्थेआधी अनौपचारिक व्यवस्था म्हणजे घरापासून सुरू होते, आजची मुलेच उद्याचे स्त्री-पुरूष असल्याने त्यांच्या जन्मापासून, बाल्यावस्थेपासून वाढ व विकासाच्या विविध टप्प्यापासून समानता जोपासत सुरुवात व्हायला हवी. आपल्या समाजात विषमता सुरू होते ती घरातच, नात्यानात्यातच. घर बदलले तरच राष्ट्र व राज्य बदलेल, समानतेवर आधारित नवी व्यवस्था शक्य होईल. आता तर आपण धोरणात्मक संथपणा व अंमलबजावणीतला सुस्तपणा सोडून वेगाने आणि अधिक महत्त्वकांक्षी व साहसी होऊन स्त्रीपुरूष विषमता दूर करीत नवनव्या प्रयासांची कृतिशील कास धरायला हवी. कारण दर क्षणाला कोठेतरी स्त्री अत्याच्याराला, विषमतेला, वर्चस्वाला बळी पडते आहे. व्यवस्थाच नव्हे तर आपण सगळेच असंवेदनशीलव बेफिकीर होऊ लागलो आहोत. अगदी उच्चशिक्षीत स्त्रीलाही अन्याय व शोषणाला तोंड द्यावे लागत आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या युएनडीपीच्या आरोग्य, सक्षमीकरण आणि रोजगार या तीन मानकांनुसार तयार केल्या जाणाऱ्या ''जेंडर इनइक्वॉलिटी इंडेक्स २०२३-२४'' च्या अहवालानुसार लिंग विषमतेत भारताचा जगातील १९१ देशांमध्ये १०८ वा क्रमांक लागतो. हाच क्रमांक २०२१ साली १२२ वा होता. वर्ल्ड इकानॉमिक फोरमच्या लिंग तफावत अहवाल २०२३ नुसार भारताचा क्रमांक १४६ देशांमध्ये १२७ वा आहे. वर्षागणिक यात उत्साहवर्धक सुधारणा होताना दिसून येते. प्रसुतीमध्ये होणारे मातामृत्यु कमी होत आहेत, शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. रोजगार व उद्यमशिलतेतील सहभाग वाढत आहे. मात्र स्त्रीयांवर होणारा हिंसाचार विविध प्रकारे वाढत असल्याचे चिंताजनक चित्र आहे. जगभरातील युद्धजन्य संघर्षात स्त्रीयांची होणारी फरफट, पर्यावरणाविषयीच्या आपत्त्यांत त्यांच्या वाट्याला येणारी अधिकची

संकटे यांची तिव्रता वाढत आहे. भारतातील ऑनर किलींग प्रकारचे वास्तव भिषण आहे. देशातील एक तृतियांश स्त्रीयांनी कोणत्या तरी प्रकारची हिंसा अनुभवली आहे. भारतातील उद्योग मोठ्या प्रमाणात असंघटीत स्वरुपात असल्याने स्त्रीयांना विशेषत: अकुशल स्त्रीयांना रोजगार गमाविण्याच्या भीतीपोटी प्रतिकार करता येत नसल्याने कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाला प्रतिबंध करणारे पोस्को वगैरे कायदे असूनही शोषण व छळाला बळी पडावे लागते. जागतिकीकरणातून स्त्रीयांना संधी मिळाल्या तसेच शोषणाचे भोगही वाट्याला आहे. आज तंत्रज्ञानातील बदलही रोजगार कमी करीत असल्याने त्रासदायक ठरू शकतील असे दिसते. ग्रामीण भागात जमीनजुमला वा काही स्थावर मालमत्ता मालकी हक्काने नावी नसल्याने काही उद्योग व्यवसाय करायचा झाल्यास बँकांतून कर्ज मिळत नाही. मुळात स्त्रीयांच्या मालमत्तेचे हक्क केवळ नावापुरता असतात. गावची सरपंच आरक्षणधोरणानुसार महिला असली तरिही तिचा नवरा वा अन्य कोणी पुरुष सगळी सूत्रे हलवितो आणि आजही सरकारी अधिकारी अशा लोकप्रतिनिधी स्त्रीयांना घटनात्मक तरतूद असूनही मानसन्मानाने वागावित नाही. हा पुरुषी मानसीकतेचा जाच कमी होताना दिसत नाही. घरकाम, मुलांचे संगोपन, इतर अनेक जबाबदारीची कामे करण्यात मेटाकुटीला येऊनही त्याची ना किंमत होते ना काही मोबदला दिला जातो. त्यामुळे ‘सर्वस्व तुजला वाहूनी, माझ्या घरी मीच पाहुणी’’ असा प्रकार अनेक ठिकाणी असतो. वेतनातील तफावत फार मोठी आहे. उदा. १९२२ च्या जागतिक विषमता अहवालानुसार भारतात श्रमकामातील उत्पन्नात पुरुषांचा वाटा ८२% तर स्त्रीयांचा वाटा केवळ १८% आहे. एकाच प्रकारच्या कामासाठी अनेकदा स्त्रीयांना कमी वेतन दिले जाते. असा प्रकार विकसीत जपानमध्ये तर सर्वसंमत आहे. स्त्रीयांना कमी पगारावर राबवून जपानने उद्योगवाढीसाठी भांडवल उभारणी केली. युनेस्कोच्या अहवालानुसार जगातील तीन पैकी एक बालिकावधू भारतात आहे. मात्र हे प्रमाण कमी होत असल्याचे दिसत आहे.

स्त्रीला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य व अधिकार भारताच्या राज्यघटनेने दिला आहे. आजवरच्या रूढी परंपरा, धार्मिक चालीरिती, उपासनाविधी अशांच्या अविवेकी जोखडांतून स्त्रीचा मुक्तीचा संघर्ष सुरू आहे. मात्र सर्वोच्च न्यायालयापासून इतर न्यायालयात स्त्री न्यायाधिशांचे प्रमाण अस्वस्थ करण्याइतके विषम आहे. स्त्रीयांचा म्हणून दबावगट निर्माण होत नाही. मात्र स्त्री कोणत्याही जातीधर्मातील असो, स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराचे वास्तव एकसमान असते. अत्याचार झालेल्या स्त्रीच्या वेदनांना व दु:खांना जातधर्म नसतो. लिंग विषमता हा मुळात एक सामाजिक अत्याचार आहे कारण लिंग हे जरी जन्मत: निसर्ग ठरवीत असला तरिही स्त्री-पुरुषाचे स्थान समाज ठरवितो. त्यामुळे समग्र बदलांसाठी अनेक आघाड्यांवर उपाययोजना कराव्या लागतात. स्त्री-पुरूष समानतेच्या ध्यासाचे घोडे अडते ते ‘‘आम्ही सांगू ते आणि तसेच’’ या पुरूषी मानसीकतेच्या अडथळ्यापाशी. त्यासाठी लिंगसमानता प्रेरक शिक्षण अगदी प्राथमिक इयत्तेपासून देणे, कौशल्य विकसन करणारे शिक्षण देणे, माहिती तंत्रज्ञान वापराच्या शिक्षणाद्वारे स्त्रीमनाचा आवाका विस्तारणे, त्यांच्यासाठी विशेष तरतूदींसह विशेष उपक्रम राबविणे, कमी प्रतिनिधित्व असलेल्या क्षेत्रांमध्ये सकारात्मक हस्तक्षेप करणारी धोरणे राबवून स्त्रीयांना कतृत्त्वासाठी विविध संधी उपलब्ध करून देणे (अर्थशास्त्रात किती अर्थतज्ज्ञ स्त्रीयांना पात्रता असूनही नोबेल पारितोषिकांसाठी विचारात घेतले गेले नाही. अणुविखंडनाचा शोध लावणाऱ्या लीस माइटनरला चौदा वेळा नोबेलसाठी नामांकन करावे लागले. विणा गवाणकरांनी माइटनरवर लिहीलेले पुस्तक वाचावे म्हणजे अगदी आधुनिक युरोपातही विसाव्या शतकात ज्ञानविज्ञान शिकण्यासाठी एका प्रज्ञावंत स्त्री शास्त्रज्ञाला काय काय सोसावे लागले, किती बाबतीत वंचित राहावे लागले ते पाहिले की मन विषन्न होते. काळ, वेळ, देश, प्रांत, जातधर्म,वंश, भाषा कोणतीही असो, स्त्रीला लिंग विषमतेचा जाच होत असल्याचे सार्वत्रिक, सार्वकालिक चित्र दिसून येते. आपल्या काळात भारतात मोठी किर्ती मिळविलेल्या किरण बेदींनाही घरातून लिंग विषमतेला तोंड द्यावे लागले. त्यांच्या वडीलांनी सगळ्या विरोधाला झुगारून मुलींना शिकवून मोठे केले हे महत्त्वाचे आहे.

लिंग विषमता ही एक सामाजिक व्याधी आहे. कृतिशील उपाययोजना करताना विरोधाची जोखिम घेणे, त्यासाठी राजकीय व विविध प्रकारची किंमत देण्याची तयारी ठेवणे, कठोर व्यापक कायदे करून त्यांची अमंलबजावणी करणे, लिंग विषमतेमुळे पिचलेल्या योग्य व पात्र लाभार्थी स्त्रीयांचा शोध घेऊन विशेष तरतूदींसह कालबद्ध इष्ट बदल घडविणाऱ्या समग्र उपाययोजना करूनच ‘आम्ही भारताचे नागरिक’’ स्त्री नागरिकांना लिंग भेदाच्या जाचक जंजाळातून मुक्त करून २०४७ पर्यंत विकसीत भारताचे स्वप्न साकार करू शकू. केवळ शब्दांच्या, उत्तम योजना व धोरणे मात्र पोकळ बकवास भ्रष्ट अंमलबजावणी असे प्रकार आता नकोत. स्त्रीयांनी स्वत:ची राजकीय शक्ती उभारायला हवी. हा काळ केवळ आव्हानास्पदच नसून लिंग विषमतेलाच आव्हान देण्याचा आहे. नव्या भारताच्या निर्मितीचे स्वप्न पाहाणाऱ्या राज्यघटनेच्या तत्त्वज्ञानाचा दोन शब्दांत व्यक्त होणारा सारनिष्कर्ष आहे तो हाच - लिंग समानता. राज्यघटनेच्या अमृतकाळात यादिवशी काहीतरी ठोस घडावे हीच इच्छा व सदिच्छा.

# लिंगसमानता : गती

शैला गोन्सालविस

कवयित्री सुप्रिया अय्यर आपल्या 'खिडकी' या कवितेत म्हणतात,

तुझं आभाळ आभाळभर
माझं आभाळ खिडकीभर
आभाळाशी माझं नातं जन्मभर''

मी एक स्त्री म्हणून ही कविता वाचताना माझ्या विचारांची चक्रे गरगरा फिरू लागली की, अशा आशयाची कविता असे स्पष्ट करते की, मी स्वत:ला खिडकी पुरत्या आभाळाशी बंदिस्त करून ठेवले आहे का? पुरूषाचं आभाळ हे आभाळभर, विस्तृत, पूर्ण मोकळीक असाच अर्थ घ्यायचा का? भारतासारख्या पुरुषप्रधान देशात स्त्रीला बंदिस्त म्हणून जगण्यास भाग पाडणाऱ्या वर्गासंबंधी, दोनशे वर्षापूर्वी ताराबाई शिंदेने लिहिले होते की, विधवेनं अंधारकोठडीत राहायचं. तिचे सौंदर्य काढून घ्यायचे मग विदुराने दाढी मिशा भादरून अरण्यवासात का जाऊ नये ? आज आठवण होते त्यांच्या विचारांची त्यांच्या निर्भयी, वस्तव्याची मग प्रश्न पडतो 'स्त्री' म्हणून मी कशी प्रगतीपथावर कालपासून आजपर्यंत आहे आणि अजूनही या ----- युगात प्रगतीचे शिखर मला कसे गाढता येईल? या अनुषंगाने विचार व कृती करणे ही काळाची गरज आहे.

गलतीपासून दिल्लीपर्यंत आणि शेतीपासून ईस्त्रोपर्यंत कुठल्याही शाखेत पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणारी आजची स्त्री म्हणजे कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक, वैज्ञानिक शाखेतील एक इंझावात आहे. हे दररोजच्या समाज माध्यमातून आपण पाहतो, ऐकतो, वाचतो, कर्तव्यात, श्रमात, कष्टात स्त्री-पुरूष जर एकसमान आहेत तर आचारणातही एक समान असणे ही काळाची गरज आहे. या समानतेला गती प्राप्त करून देण्यासाठी माझ्या घरापासून मला सुरूवात करावी लागेल. जीवन चक्राचा रहाट गोलाकार पद्धतीने फिरविताना समजूतदारपणे घरातील पुरूषांना प्रत्येक कामाची सवय लावणे अगत्याचे आहे. भाजी चिरण्यापासून फोडणी देण्यापर्यंत, भांडी घासण्यापासून घरांची साफसफाई, मुलांचा अभ्यास घेण्यापर्यंत सगळी कामे सारख्याच पद्धतीने करायची आहेत. असे वातावरण ज्या घरात असेल त्या घरातील भावी पिढीसमोर हा जगण्याचा, आचरणाचा आदर्श निर्माण होईल. घरात मुलीचे काम मुलाचे काम, शिक्षण, खाणे-पिणे खेळणे वेगवेगळे असता कामा नये. मुलाला व मुलीला समान शैक्षणिक संधी, मौजमजा करण्यास समानतेची वागणूक दिली तर निकोप वृत्तीची भावी पिढी आपण घडवू शकतो.

सामाजिक, राजकीय, सहकारी, शैक्षणिक क्षेत्रात 'हम भी किसी से कम नही' या वृत्तीप्रमाणे आपली मते ठामपणे मांडणे. कुणालाही न भिता सत्य निर्भिडपणे मांडण्याचे आव्हान स्वीकारणे. आपले आयुष्य काही पुण्याची शय्य नाही तर ते कर्तव्याने भरायचे माप आहे. कर्तव्यपूर्ती करणारे आपले मन व मनगट मजबूत ठेवणे. कुठल्याही क्षणी ते कमकुवत होता कामा नये. मी माझे स्वातंत्र्य कसे? कुठे? केव्हा उपभोगायचे याचा तारतम्याने विचार केला पाहिजे. हे स्वातंत्र्य स्वैराचर असता कामा नये. निरोगी, स्वातंत्र्य मला टिकवता आले पाहिजे. स्लॉवेश हायझेक या विचारवंताचे एक पुस्तक आहे 'मूर्त स्वातंत्र्य एक न बरा होणारा रोग' आम्हाला असे. मुर्त स्वातंत्र्य निर्माण करायचे नाही. तर जिथे मनाचे खर्चीकरण होणार नाही, जिथे स्वहित, कुटुंबहित, समाजहित राष्ट्रहित साधले जाईल आणि निरोगी वातावरणाचे मंद मंद ध्वनी आसमंतात पसरतील असे स्वातंत्र्य आम्ही स्वत: निर्माण करण्याचे आव्हान पेलणे व कृतीत उतरविणे होय. खंबीर मन, आत्मविश्वास, आचरण, महत्त्वाकांक्षी वृत्ती समानतेकडे वाटचाल करीत असते.

समाजरूपी इमारतीचा महत्त्वाचा खांब असलेली ही स्त्री म्हणजे त्यागमूर्ती, कुटुंबांची नि:शुल्क सेवा करणारी नातेसंबंधाची वीण घट्ट करणारी, कुटुंबाभोवती संरक्षणाचे कवच उभे करणारी आहे. याची जाण समाजपुरूषाने ठेवावी आणि ती ठेवण्यासाठी अगदी कौतुकास्पद आचरण तिच्या हातून क्षणोक्षणी, पदोपदी घडविले जाण्याचे असीम व्रत तिच्या हातून पार पडण्याचे आव्हान तिने निर्भयपणे स्विकारून आपल्या कर्तव्यात कधीही उणेपणा कडू न देता जगण्याचा आदर्श निर्माण केला तर मला वाटते लिंग-समानतेला गती तर मिळेलच परंतु असमानतेचा विषय समाज व्यवस्थेतून निकालात काढला जाईल. स्वाभिमानाची जागृतता, समजूतदार व न्यायी वृत्ती. कर्तव्य तत्परता जेथे ज्या ठिकाणी असेल तेथे समानतेची अगरबत्ती पेटेल. अवती-भवती सुगंधाची बरसात होईल आणि प्रत्यक्ष-प्रत्यक्षपणे समानतेसाठी लढा उभारण्याची गरजच भासणार नाही पायाला पानं बांधून चालणारी डोंगर कपारीतील स्त्री असो, अगर शहरात जिन्स-टॉप घालणारी, हेयर कट करणारी स्त्री असो, सगळ्यांसाठी समाज व्यवस्था बदलण्याचे सामर्थ्य तयार होईल. खलील जिब्रान एके ठिकाणी म्हणतात,''विसरू नका, तुमच्या अनवाणी पायाच्या स्पर्शाने वसुंधरेलाही शहारून जायचे असते आणि तुमच्या केसांच्या बटाशी खेळण्याची वाऱ्यालाही आस असते.'' म्हणजेच निसर्गही या समानतेचा तुमच्या सहाय्यालाही नक्कीच धावून येईल..

# लिंगभाव समानतेसाठी चळवळ हवी !

**प्रा. पूनम गायकवाड**
स्त्री चळवळीच्या अभ्यासिका
सिंधुदुर्ग उपपरिसर, मुंबई विद्यापीठ.
B.A., M.A., M.S.W., M.PHIL., NET., PH. D(SCHOLAR)

भारतीय पितृसत्ताक समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीला दुय्यम स्थान आहे. ते नेमके कसे यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. समाजात लिंगभाव असमानता यासाठी जबाबदार असून सगळयात आधी लिंगभाव म्हणजे काय हे जाणून घेणे इथे आवश्यक ठरते. आपल्याला ज्ञात आहेच महिला आणि पुरुष यांच्या शरीररचनेमध्ये फरक असतो. पण समाजामध्ये महिला आणि पुरूषांमध्ये जे भेदभाव केले जातात ते त्यांच्या लिंगावरून नाही तर लिंगभावावरून केले जातात, हे लक्षात घ्यायला हवे. लिंग हे शारीरिक आहे तर लिंगभाव हे सामाजिक आहे, याबाबत स्त्रीवादाचे बायबल समजले जाणारे 'द सेकंड सेक्स' या पुस्तकाचा आधार महत्त्वाचा ठरतो. यामध्ये पुस्तकाच्या लेखिका सिमॉन द बुव्हा असे म्हणतात "स्त्री जन्मत नाही तर ती घडवली जाते." लिंगभाव समजून घेताना त्यांच्या या वाक्याचा उहापोह होणे गरजेचे आहे. कारण स्त्रिया आणि पुरुषांना कुटुंबामध्ये वेगवेगळया पद्धतीने वाढवले जाते. यात स्त्रियांनी कसे वागावे आणि पुरुषांनी कसे वागावे यांचा एक मापदंडच आखून दिलेला आहे. मूल अगदी लहान असते त्या वेळी मुलगा असेल तर निळया रंगाची कपडे आणणे तर मुलगी असेल तर पिंक /गुलाबी रंगाची कपडे आणणे. त्यांना काही खेळणी आणली तर त्यामध्ये मुलीसाठी लहान बाहुली किंवा भातुकली खेळण्यासाठी भांडीकुंडीचा सेट आणणे. मुलांसाठी मात्र सायकल, कार, बंदूक, बॅट बॉल तसेच मैदानी खेळाचे साहित्य आणून दिले जाते. मुलीनी मैदानी खेळ खेळायचे नाही. या सगळ्या गोष्टी माणसाच्या मनावर इतक्या खोल रुजल्या जातात की स्त्री आणि पुरुष या दोन वेगळया कल्पना आहेत आणि सामाजिक जीवन जगत असताना त्या प्रत्येक व्यक्तीच्या वागणुकीवर प्रभाव टाकत असतात. उदा. स्त्रियांनी नेहमी नम्र, सहनशील आणि आज्ञाधारक असावे. तिने सर्वाशी जुळवून घेतले पाहिजे. याबाबत पुरुषांना मात्र मोकळीक असते. त्यांनी आक्रमक असले पाहिजे, असे असले तरी पुरुषांना रडायची मोकळीक नाही. तो रडायला लागला तर काय मुलीसारखे मुळू मुळू रडत आहेस म्हणून त्याला हिणवले जाते.

घरकाम आणि चूल मूल ही बाईची जबाबदारी तर घराबाहेरच्या जबाबदाऱ्या सर्व पुरुषांच्या मानल्या जातात. मी वर्गामध्ये लिंगभाव ही संकल्पना शिकवत असताना याविषयीची उदाहरणे सांगा असे सांगितल्या नंतर माझ्या विद्यार्थ्यांनी सांगितले "महिला कोणत्याही धार्मिक कार्यात नारळ फोडत नाहीत, तर ती कृती नेहमी पुरुषच करतात. तसेच मृत व्यक्तीला अग्नी हा त्याचा मुलगा किंवा घरातील पुरुषच देतात महिला कधीच देत नाही. घरामध्ये सर्व भांडी घासण्यापासून ते इतर सर्व कामे ह्या महिलांच करत असतात. समान शेतमजुरीचे काम करताना महिलेला कमी वेतन दिले जाते."अशी बरीच उदाहरणे त्यांनी सांगितली. यावरून असे म्हणता येईल की लिंगभाव हा सामाजिक सांस्कृतिक संरचनेतून घडविला जातो. आपण ज्या पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये राहत आहोत तेथे सर्व सत्ता पुरुषांच्या हाती आहे. कुटुंबप्रमुख पुरुष, मालमत्ता हक्क पुरूषांकडेच, लग्न झाल्यावर स्त्रियांनी सासरी जाणे हे सगळे आपण पितृसत्ताक व्यवस्थेमध्ये राहत आहोत हेच दाखवून देतात. अश्या स्त्रियांचे स्थान दुय्यम आहे हे दर्शवितात. पण याचा गंभीर परिणाम म्हणजे स्त्रियांना अनेक अत्याचारांना सामोरे जावे लागते. एखादी व्यक्ती स्त्री आहे किंवा पुरुष आहे म्हणून तिच्याकडून ज्या अपेक्षा केल्या जातात त्याचा संबध लिंगभावाशी जोडला जातो. एकाच घरातील किंवा संस्कृतीतील स्त्री- पुरुष यांच्यात समाजाने केलेला फरक म्हणजेच लिंगभाव होय.

ऐतिहासिक दृष्टिकोनातून स्त्रियांच्या स्थानांचा विचार केला तर यामध्ये बरेच चढउतार आपल्याला पहायला मिळतात. प्राचीन काळी आपणास थोडीफार समानता आढळून आली पण कालांतराने त्यामध्ये खूप बदल झाला. प्रामुख्याने मनुस्मृतीत सर्वप्रथम स्त्री स्वांतत्र्यावर गदा आली. स्त्री कधीच स्वतंत्र नसते किंवा तिने सतत पुरुषांच्या / व्यवस्थेच्या अधीन कसे रहावे यासाठीचे तिच्यावर अनेक निर्बंध लादण्यात आले. तिला गुलामगिरीत ढकलण्यात आले. पुढे मोघलकाळात सुद्धा निर्बंध अधिकाधिक वाढले. पाचव्या सहाव्या वर्षीच मुलींची लग्ने आई-वडील करू लागले. विधवा झाल्यानंतर तिला सती जाण्यास भाग पडण्यात आले. बहुपत्नीत्वाची प्रथा निर्माण करण्यात आली. यावर स्वातंत्र्य पूर्वीच्या कालखंडात राजा राम मोहन रॉय, ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि राजश्री शाहू महाराज यांनी केलेल्या विविध चळवळीमुळे बराच बदल झाला. या सर्व समाज सुधारकांनी ब्रिटिशांना स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी अनेक सामाजिक कायदे संमत करायला लावले. ब्रिटिशांनी काही कायदे संमत केले. पुढे भारत स्वतंत्र झाल्यांनतर आपल्या राजघटनेमध्ये अनुच्छेद १४ हे महिलांना समानता, प्रतिष्ठा आणि सन्मानाची हमी देते. याशिवाय महिला आणि पुरूषांमधील भेदभावाला लगाम लावते. घटनेच्या १५ (३) अन्वये राज्यांना (भारतीय संघ) महिला आणि मुलासाठी विशेष तरतूद करण्याचा अधिकार आहे.

महिलांच्या उन्नतीसाठी विशेष प्रावधान करणे हा यामागचा

उद्देश आहे. त्याचप्रमाणे घटनेचा अनुच्छेद १६ (२) सर्व स्त्री आणि पुरुष या दोघांनाही समान संधी प्रदान करतो. घटनेच्या कलम ३९ ए नुसार राज्यातील पुरुष आणि स्त्रियांसाठी पुरेसा उपजीविका उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे. तसेच घटनेच्या कलम३९ (डी) नुसार पुरुष आणि महिलांना कामाची संधी आणि समान वेतन देणे बंधनकारक आहे. तसेच ३९ (ई)अ अनुसार महिला कामगारांच्या आरोग्याचा आणि शक्तीचा गैरवापर होत नाही हे निश्चित करणे राज्यांना आवश्यक आहे. आर्थिक मजबुरीमुळे महिलांच्या शक्तिपलीकडे त्यांना कोणताही व्यवसाय करायला भाग पाडायला नको. अनुच्छेद ४२ मध्ये असे म्हटले आहे की राज्य योग्य आणि मानवी कामांच्या प्रसूतीपासून बचाव करण्याची तरतूद करेल. १९६१ मध्ये महिलांच्या हितासाठी प्रसूती लाभ कायदा मंजूर झाला आहे. घटनेतील अनुच्छेद ५१(अ) (ई) महिलांना अपमानास्पद वागणूक देवू नये व हे कर्तव्य समजावे अशी शिकवण देते. यावर अधिक स्पष्टीकरण द्यायचे झाले तर भारतीय घटनेतच महिलांच्या संरक्षणासाठी प्रभावी तरतुदी आहेत. भारतीय राज्यघटनेच्या कलम १४,१५,१६,३९ आणि ५१(अ) च्या मूळ उद्दिष्टाला लक्षात घेता राज्याने अनेक कायदे तयार केलेले आहेत. यामध्ये हुंडा देणे आणि घेणे यावर प्रतिबंध बसावा, यासाठी हुडाबंदी कायदा( १९६१), स्त्री भृण हत्या रोखण्यासाठी १९७१ ला अधिनियम लागू करण्यात आला.

कौटुंबिक हिंसाचारात महिलांचे संरक्षण मिळावे यासाठी २००५ मध्ये कायदा तयार करण्यात आला. महिलांचे हित लक्षात घेता त्यांना घरगुती किंवा कोणत्याही अत्याचारापासून संरक्षण देण्यासाठी हा व्यापक कायदा आहे. किमान वेतन कायदा १९४८ पुरुष किंवा स्त्रिया याच्या किमान वेतनामध्ये भेदभावास परवानगी देत नाही. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ ( प्रतिबंधित आणि संरक्षण) कायदा २०१३ सार्वजनिक आणि खाजगी अश्या दोन्ही क्षेत्रातील कामाच्या ठिकाणी महिलांना लैगिक छळापासून संरक्षण प्रदान करते. सगळे कायदे व घटनात्मक तरतूद असली तरी स्त्रियांवर होणारे शारीरिक आणि मानसिक अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालल्याचे दिसते. शारीरि शोषण घरगुती हिंसाचार लैंगिक छळ आणि स्त्रीभ्रूण हत्या, हुंडाबळी सारख्या घटना रोज समोर उघड्या डोळयांनी बघत आहोत. या सर्व अत्याचाराला लिंगभाव भेदाभेद हेच कारणीभूत आहे. एक सोशल वर्कर म्हणून असे वाटते की लिंगभाव समानता आली तरच सर्व अत्याचार संपुष्टात येतील यासाठी ह्या सर्व कायद्याची प्रभावी अमंलबजावणी तर झालीच पाहिजे पण त्याचबरोबर गावागावात, वस्तीवस्ती मध्ये तसेच सर्व शाळांमध्ये लिंगभाव समानतेचे धडे देणे गरजेचे आहे. एवढ्यावराच न थांबता लिंगभाव यासंबधाने गतीशीलपणे व्यापक चळवळ राबवणे सजग नागरिक म्हणून आपल्या सगळयाची जबाबदारी ठरते.



**अभ्यासदौरा**



**कायदेविषयक प्रशिक्षण**



**SHW कार्यशाळा**



**स्वसंरक्षण कार्यशाळा**

# एप्रिल ते सप्टेंबर अहवाल

## वस्ती कार्य

**बालदिन -** १४ नोव्हेंबर हा दिवस भारतात बालदिन म्हणून साजरा केला जातो. बालपण हा जीवनाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. मुलांचे उत्तम भविष्य सुनिश्चित करण्यासाठी योग्य संगोपण, काळजी व पोषण आवश्यक आहे. बालदिन साजरा करण्यामागील उद्देश हा बालकांना त्यांच्या हक्कांबाबत जागरुकता पसरविणे, त्यांचे कल्याण साधणे हा आहे. हा हेतू लक्षात होऊन संस्थेने ठाणे व वसईतील आदिवासी मुलांच्या गटासोबत खेळ, गाणी भाष्य, चर्चासत्र ह्या माध्यमातून बालदिन साजरा करण्यात आला.

**महिला सक्षमीकरण व कायदे :** महिलांची सुरक्षितता, संरक्षण आणि सक्षमीकरण ह्यादृष्टीने महिलांसंबधित कायदे जसे की, बालविवाह प्रतिबंधक कायदा, समानवेतन, स्त्रियांचे संवैधानिक अधिकार, विवाहीत महिलांचा संपत्तीचा कायदा मातृत्त्व लाभसंबधीचा कायदा, लिंग निदान प्रतिबंधक कायदा, (PCPNDT) घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा २००५, कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारी लैंगिक हिंसा प्रतिबंधक कायदा २०१३ ह्याविषयी पारोळ, अर्नाळा, गांजे-ठेकाळे, कंळभोण गावात एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पामार्फत आयोजित महिला मेळाव्यात मार्गदर्शन करण्यात आले.

**समनाता जगजागृती :** स्त्री पुरुष समानता जाणून घेण्याची गरज फक्त स्त्रीयां नाही तर पुरुषांनी देखील ह्याबाबत समजून घेणे, महत्त्वाचे आहे. ह्यादृष्टीने वस्तींमधील पुरुष गटांसोबत, शाळा-कॉलेजमधील मुलांसोबत, तसेच कंपन्यामधील कर्मचारी वर्गासोबत चर्चा सत्रे घेण्यात आली.

**कौशल्य प्रशिक्षण :** टाकऊतून टिकावू, घरातील शोभेच्या वस्तू, कापडापासून दागिने बनविण्याचे प्रशिक्षण कार्यशाळा सफाळ्यातील नारोडा, रोडखडच्या महिलांगटासोबत, तर माकूणसार एस.के. पाटील स्कूल तसेच जिल्हा परिषद शाळा आचोळेतील मुलींच्या गटासोबत राबविण्यात आली.

**घरगुती हिंसा :** घरगुती हिंसा म्हणजे काय, त्याचे प्रकार, हिंसाचारचा महिलांच्या आरोग्यवर होणारा परिणाम घरगुती हिंसा प्रतिबंधक कायदा ह्याविषयी जनजागृती करणारे चर्चासत्र पालघर, नालासोपारा व ठाणेतील वस्तीपातळीवर घेण्यात आले.

**कचरा व्यवस्थापन व आरोग्य :** वाल्मिकी पाडा ठाणे येथे नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी कचरा व्यवस्थापन स्वच्छता व आरोग्य ह्या विषयावर पथनाट्य केले तसेच कचरा, स्वच्छता व आरोग्यावर त्याचा होणारा परिणाम ह्याविषयी जनजागृती करणेकरीता रॅली काढण्यात आली. ज्यामध्ये त्या वस्तींतील महिलांनी देखील स्वस्फुर्तीने सहभाग घेतला.

## विद्यार्थी व व्हालेन्टीयर

**SIEP नेरळ विद्यार्थी**

कॉलेजच्या सीड्स ऑफ इक्वॉलिटी उपक्रमाद्वारे सफाळे गावात भेट देऊन तेथील स्थानिक आव्हाने समजून घेण्यासाठी सर्व्हेक्षण केले, सेंद्रीय शेती, लैंगिक समानता आणि कौशल्य विकास कार्यशाळा ह्याबाबत चर्चासत्र घेतले, तसेच महिलांचे सक्षमीकरण आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी काय उपाययोजना आखता येतील ह्याबाबत चर्चा केली.

**सोफया कॉलेज विद्यार्थी :** सोफया कॉलेज मुंबईच्या विद्यार्थीनींनी वस्तीतील मुलांच्या गटासोबत बालदिनाचे कार्यक्रम घेतले तसेच कॉम्प्युटर कौशल्य प्रशिक्षण घेतले.

## प्रशिक्षण कार्यक्रम

**स्वसंरक्षण व महिला सक्षमीकरण**

स्वसंरक्षण प्रशिक्षण हे एक जीवन कौशल्य आहे. जे त्यांच्या सभोवतालच्या परिस्थितीबद्दल अधिक जागरुक राहण्यास आणि कोणत्याही वेळी अनपेक्षित परिस्थितीसाठी तयार राहण्यास मदत करते. स्वसंरक्षण प्रशिक्षणाद्वारे, मुलांनी मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक दृष्ट्या सक्षम बनण्यास शिकविले जाते. जेणेकरून ते संकटाच्यावेळी स्वत:चे संरक्षण करू सकतील. प्रत्येक मुलींनी, महिलेने स्वत:चे संरक्षण करण्याची युक्ती जाणून घेणे खूप गरजेचे आहे. म्हणून ठाणे सिव्हिल हॉस्पिटल नर्सिंग कॉलेजमध्ये ANM आणि GNM विद्यार्थ्यांसाठी स्वसंरक्षण कार्यशाळा राबविण्यात आली.

**कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारी लैंगिक हिंसा संबंधित कायदा २०१३ (POSH Act) -**

संबधित कार्यशाळा St. Mary School, माझगाव,

Nexon Omniverses Limited, RBI Bank नरिमन भवन, फोर्ट, वर्ल्ड ट्रेड सेंटर, तसेच चौधरी इंटरनॅशनल प्रा. लि. Fourth Signal आणि Western Railway Audit Employees ह्यांच्या कर्मचारी वर्गाकरीता घेण्यात आली. ज्यामध्ये कामाच्या ठिकाणी महिलांवर होणारी लैंगिक हिंसा, त्याचे प्रकार प्रतिबंध व कायद्यास संदर्भातील माहिती देण्यात आली.

**ताणतणाव नियोजन :**

मानव अधिकार दिनाचे औचित्य साधून सख्यच्या २०२५च्या मानसिक स्वास्थ ह्या विषयावरील दिनदर्शिकेचे विमोचन अर्नाळ्यात एकात्मिक बालविकास सेवा योजना प्रकल्प अधिकारी (वसई) ह्याच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी जमलेल्या सर्व अंगणवाडी सेविकांना कामाच्या ठिकाणी येणारा ताणतणाव आणि त्याचे नियोजन कसे करावे ह्याचे मार्गदर्शन केले.

**महिलांवरील हिंसाचार आणि सुरक्षा उपाय :**

आदिवासी मुलींचे शासकीय वस्तीगृह गिरीज येथील विद्यार्थ्यांनी सोबत महिलांवरील हिंसाचार त्याचे प्रकार कायद्यात त्याबाबत दिलेली सुरक्षा, ह्याबाबत चर्चासत्र घेऊन मुलीना जर अशा काही समस्या येत असतील तर स्पष्टपणे बोलण्यास सांगितले किंवा तसे जमत नसल्यास लिखित स्वरुपात कळविण्याकरीता तक्रारपेटी ठेवण्यात आली.

**डिजीटल साक्षरता :**

Courth Signal कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सख्य संस्था काम करीत असलेल्या युथ ग्रुप सोबत डिजीटल साक्षरता ह्याविषयी प्रशिक्षण घेतले. संगणकीय मुलभूत कौशल्य तसेच कॉम्प्युटर आत्मविश्वासाने व प्रभावीपणे आणि सुरक्षितरित्या कसे हाताळावे तसेच सायबर गुन्हांपासून स्वबचाव कसा करावा, वर्ड प्रोसेसर, ईमेल आणि प्रेझेंटेशन सॉफ्टवेअर वापरण्याची क्षमता कशी वृद्धींगत करावी तसेच संगणकीय इतर प्रोग्रामची माहिती ह्याबाबत मार्गदर्शन केले.

**विशेष कार्यक्रम :**

**दिवाळी सोहळा व सर्पोटग्रुप प्रोग्राम :**

ठाण्यातील वाल्मीकी पाडा व नालासोपाऱ्यातील निर्मळमध्ये वस्तीतील महिलांकरिता दिवाळी मेळावा व सर्पोट ग्रुप प्रोग्रामचे आयोजन केले होते. हिंसामुक्त समाजाचे उद्दिष्ट्य घेऊन जमलेल्या सर्व लोकांसोबत महिलांना आपण कसे मदत करता येईल यावर चर्चा करण्यात आली. आपल्या जीवनात प्रकाशाचे महत्त्व ह्या विषयावर फादर अग्नेलो ह्यांनी भाष्य केले. मनोरंजक खेळ, गाणी, स्पॉट प्राइजेच्या माध्यमातून सहभागीतांनी मजा, आनंद व उत्साहात हा कार्यक्रम साजरा केला.

**अभ्यास दौरा :**

घरगुती हिंसा, सामाजिक दडपण, कामाच्या ठिकाणी होणारा मानसिक तणाव, आर्थिक चणचण ह्यामुळे महिला सतत मानसिक तणावात असतात. त्याचा परिणाम त्यांच्या मानसिकतेवर व आरोग्यावर होत असतो. ह्या सर्व तणावांचे व्यवस्थापन कसे करावे तसेच मानसिक स्थैर्य मिळविण्याकरीता ध्यानधारणा आत्मचिंतन कसे उपयोगी ठरते. ह्याचा अभ्यास करण्यासाठी नालासोपारामधील वस्तीतील महिलांचा अभ्यास दौरा भायंदर येथील ग्लोबल पागोडा येथे नेण्यात आला, तसेच एकदिवस तणावमुक्त राहण्यासाठी भाटीया बंदर समुद्रकिनाऱ्यावर सहल व मनोरजनात्मक खेळ घेण्यात आले.

**मकर संक्राती सोहळा व सर्पोट ग्रृप प्रोग्राम**

नेहरुनगर ठाणे येथे मकर संक्रातीनिमित्त ग्रृपकरिता खास कार्यक्रमाचे आयोजन केले. ज्यात खेळ, गाणी, नृत्यांनी कार्यक्रमाला बहार आणला. ह्या कार्यक्रमाकरीता महिला बालविकास विभागाचे व चाईल्ड लाईनमधून श्रद्धा नारकर व श्री. किरण नागरे ह्यांनी उपस्थित महिलांना बाललैंगिक शोषण, पालकांची जबाबदारी, हेल्पलाईन नंबर, प्रतिबंधात्मक खबरदारी तसेच महिला सक्षमीकरण, घरगुती हिंसाचाराच्या केसेसमध्ये सुजाण नागरिक म्हणून आपली जबाबदारी ह्याविषयी मार्गदर्शन केले.

## समन्वय :

स्नेहा संस्थेने आयोजित केलेल्या हिंसाचारला प्रतिबंद ह्या विषयावर आधारीत परिषदेते सख्यने समवैचारिक संस्थासोबत सहभाग घेतला.

मानवी तस्करीबाबत जागरुकता वाढविणाऱ्या Walk for Freedom ह्या जनजागतीपर कार्यक्रमात सख्यने इतर समवैचारीक १७ संस्थासोबत पालघर फोरम समितीने आयोजित ह्या उपक्रमात सहभाग घेतला.

## आंतरराष्ट्रीय

१९९३ मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने परिभाषित केल्यानुसार महिलांवरील हिंसा म्हणजे लिंग आधारित हिंसाचाराचे कोणतेही कृत्य ज्यामुळे महिलांना शारीरिक, लैंगिक किंवा मानसिक हानी

पोहोचते किंवा त्याचा परिणाम होण्याची शक्यता असते. त्यांनी स्वातंत्र्यापासून वंचित ठेवणे. ज्यात महिलांना दिल्या जाणाऱ्या धमक्यासुद्धा समाविष्ट असतात.

महिला हिंसाचार विरोधी ही मोहीम २५ नोव्हेंबर महिला हिंसाचार विरोधी दिन पासून ते दहा डिसेंबर आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनापर्यंत १६ दिवस राबविली जाते. २०२४ च्या आंतरराष्ट्रीय दिनाचे ब्रीदवाक्य No Excuse. महिलांवरील हिंसाचार संपवण्यासाठी एकजूट व्हा असे आहे. हिंसाचाराच्या विरोधात १६ दिवसांच्या या मोहिमेत महिला आणि मुलींवरील हिंसाचार संपुष्टात आणण्यासाठी जागरुकता निर्माण केली जाते आणि हिंसाचारविरुद्ध सक्रीय होण्याचे आवाहन केले जाते.

**मोहिमांचे उदि्दष्ट आहे :**

- महिलांवरील हिंसाचाराचे प्रमाण आणि खरे स्वरुप याबद्दल जागरुकता वाढविणे.
- महिला आणि मुलींवरील हिंसाचार बंद करा.
- महिलांवरील हिंसाचार प्रत्येक देशात आणि संस्कृतीत होतो हे हायलाइट करणे.
- महिला आणि मुलींवरील अत्याचार रोखणे.

महिलांवर होणारी हिंसा ही केवळ भारतातच नाही तर संपूर्ण जगभरात होत आहे. महिलांवर होणारी हिंसा रोखण्यासाठी महिलांनी तर पुढाकार घ्यायलाच हवे सोबतच पुरुषांच्या कणखर आवाजाचीही साथ हवी आहे.

दरवर्षी सख्या संस्थासुद्धा वेगवेगळ्या माध्यमा माध्यमांचा उपयोग करून या आंतरराष्ट्रीय मोहिमेत सहभाग घेत असते. यावर्षी पथनाट्य सादरीकरण, दार ठोठावणे अभियान, शाळा कॉलेजच्या विद्यार्थ्यांबरोबर तसेच हॉस्पिटल कर्मचारी नर्सिंग विद्यार्थी आसा वर्कर्स अंगणवाडी सेविका यांच्यासोबत जनजागृती पर चर्चासत्र, रॅली काढणे, पोर्स्ट व माहितीपत्रके वाटप करणे यासारख्या कार्यक्रमाचे आयोजन करीत आहे.

**ठिंबक सिंचन प्रकल्प उद्घाटन सोहळा : वाटचाल शाश्वत विकासाकडे :**

सख्य महिला मार्गदर्शन केंद्र आणि फोर्थ सिग्नल यांच्या संयुक्त विद्यमाने रोडखड डॅम जवळील पाझर तलावालगत असलेल्या मोरावने जंगलात ठिबक सिंचन प्रकल्प राबविण्यात आला आहे, ह्या प्रकल्पाचा उपयोग उपजिविका साधन तसेच भाजीपाला लागवड करण्यासाठी होणार आहे.

२५ वर्षांपूर्वी नारोडा गावातील रहिवासींनी रोडखड डॅम जवळील मोरवणे जंगलात वन हक्क कायदा अंतर्गत जमिनीचा कस राखून ठेवणे आणि जंगल सुरक्षा दृष्टीने शेती लागवड करायला सुरुवात केली पण त्यात त्यांचे जेमतेम उत्पन्न येवून कसाबसा उदरनिर्वाह होत असे.

सख्य संस्थेने सफाळेमधील नारोडा गावात काम करायला सुरुवात केली आनि संस्थेच्या लक्षात आले की, शेती लागवड करण्यासाठी या जंगलात हे आदिवासी बांधव डोंगरालगतच्या पाझर तलावातील पाणी शेती लागवड करण्यासाठी वापरायचे, त्याकरीता ते तलावातील पाणी डोक्यावरून वाहून नेवून शेतीला देत होते, त्याकरिता त्यांना प्रचंड शारीरिक कष्ट, परिश्रम आणि वेळ द्यावा लागत होता, त्यांचे कष्ट, परिश्रम बता सख्य संस्थेने त्यांना पाणी उपसण्याकरिता पेट्रोल वर चालणारी मोटार पंप व पाईप घेऊन दिले, त्यामुळे त्यांचे कष्ट कमी झाले, आणि ही ऊर्जा त्यांनी अधिक शेती लागवड करायला वापरली, परंतु संस्थेच्या अभ्यासात लक्षात आले की, यामुळे केवळ ज्यांच्या प्लॉट पासून पाझर तलाव जवळ आहे केवळ ते तीन चार कुटुंब याचा लाभ घेऊ लागला, म्हणून संस्थेने येथे पाण्याची टाकी बसवून पाईप लाईन करून, ठिबक सिंचन प्रकल्प राबविण्याचे ठरविले, त्यानुसार अश्या पद्धतीचा अधिक अभ्यास करण्याकरिता नारोड्यातील नेतृत्त्व गुण असलेल्यांना विक्रमगड येथे एक प्रकल्प पाहण्यास नेले होते तसेच तद्नंतर त्यांची कोर कमिटी करून प्रकल्पाचा आराखडा तयार करण्यात आला.

ह्या प्रकल्पामुळे जवळपास पंचवीस कुटुंबांना फायदा होईल, याकरीता तेथील लाभार्थ्यांनी श्रमदान देखील केले आणि हा प्रकल्प उभा राहिला.

ह्या प्रकल्पाच्या उद्घाटन सोहळा दिनांक २३ नोव्हेंबर रोजी अगदी साध्या पद्धतीने, लाभार्थी तसेच श्रमदान करणारे आणि ह्या प्रकल्पाचे स्वप्न पूर्ण करणाऱ्या फोर्थ सिग्नल व सख्य संस्थेच्या कर्मचारी यांच्यासमवेत आनंदाने पार पडला.

आत्तापर्यंत केवळ पावसाळी भातशेती करत उदरनिर्वाह होत असे पण आता सेबतच भाजीपाला पिके, फळझाडे, फुलझाडे यांचे लागवड केली जाणार आहे आणि विरारच्या बाजारात व स्थानिक बाजारात विक्री करून व उत्पन्न वाढवून कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी ह्या प्रकल्पाची मदत होईल. महिलांचे कष्ट, परिश्रम कमी होईल आणि हीच खरी शाश्वत विकासाच्या दृष्टीने सुरुवात आहे.

**कल्पतरु ग्रामीण (बिगर शेती) सहकारी पतसंस्था मर्यादित, भुईगाव**

REG. NO. : TNA (VSI) / RSR / (CR) 728/95-96

हार्दिक शुभेच्छा !

कोकण विभागातील अग्रेसर पतसंस्था

**जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी वाघोली**

मोबाईल नं. मुख्यालय - ७७६९९७३८६४ / ८००७८४५३८६

आधुनिक तंत्रज्ञाना द्वारे
ग्राहक सेवा देणारी पतसंस्था

- Net Banking
- Digitialzationa
- RTGS
- NEFT
- Mobile APP
- QR Code



आजच आपल्या जवळच्या शाखेत भेट द्या
व अधिक माहिती जाणून घ्या.

सेवामयी शाखा

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी | नालासोपारा |
|---|---|---|---|---|---|
| 8007955430 | 7261919012 | 08550910264 | 7261919013 | 08550910643 | 7875895508 |



लग्नाच्या ४० व्या
वर्धापन दिनानिमित्त

देवाचे व माऊलीचे आभार
व आशीर्वाद...



श्री. व सौ.
लुईजा पिटर डिसोजा
सोजआळी






बालदिन




कौशल्य प्रशिक्षण





जनजागृती कार्यक्रम